# जनसंपर्क अधिकारी कार्यालय, पालघर

**P.R.O. Office,Palghar**

phone no 02525-297032,Mo No 8669604078
Address-sp office Bidco Road,Palghar west
E-Mail- propalghar@gmail.com


## प्रेसनोट क्र. ५२० दिनांक १७/०६/२०२०

## मनोर पोलीस ठाणे यांचेकडुन तबांकुजन्य पदार्थांची वाहतुक करणा-या आरोपीतावर कारवाई करुन ३५,२२,२४०/- रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त

दिनांक १६/०६/२०२० रोजी पहाटे ०४.०० वाजताचे सुमारास मनोर पोलीस ठाणे हद्दीतील मौजे टेन गावचे हद्दीत ताज ईन हॉटेलच्या परीसरात आरोपीत टेंम्पो क्रमांक MH48AY8498 वरील अज्ञात चालक याने महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधित असलेला व मानवी जिवीतास अपायकारक असलेला विमल सुगंधी सुपारी पान मसाला व सुगंधी तंबाखुचा माल कोणत्यातरी अज्ञात व्यक्तीकडुन खरेदी करुन तो माल कोणत्यातरी अज्ञात व्यक्तीस विक्री करण्याकरीता टेंम्पोमध्ये भरुन वाहतुक करुन टेंम्पो हॉटेल परीसरात उभा करुन कोठेतरी पळुन गेला. आरोपीत याचे ताब्यातुन १) १५,५५,८४०/- रुपये किंमतीचा विमल पान मसाला सुगंधी सुपारीच्या खाकी रंगाच्या एकुण ४० मोठ्या गोणी प्रत्येक गोणीमध्ये ०४ लहान गोणी व प्रत्येक लहान गोणीमध्ये एकुण ५२ पॅकेट, एका पॅकेटमध्ये एकुण २२ पाऊच प्रत्येक पाऊचची किंमत ८.५०/- रुपये. २) २,७४,५६०/- रुपये किंमतीचा V-1 सुगंधी तंबाखुच्या सफेद रंगाच्या एकुण ०८ मोठ्या गोणी, प्रत्येक गोणीमध्ये एकुण ०५ लहान गोणी त्यामध्ये आणखीन ०४ लहान गोणी एका लहान गोणीमध्ये एकुण ५२ पॅकेट व प्रत्येक पॅकेटमध्ये एकुण २२ पाऊच एका पाऊचची किंमत १.५०/- रुपये, ३) १,७४,२४०/- रुपये किंमतीचा विमल पान मसाला सुगंधी सुपारीच्या खाकी रंगाच्या एकुण ०४ मोठ्या गोणी प्रत्येक गोणीमध्ये १० लहान गोणी एका लहान गोणीमध्ये एकुण २२ पॅकेट, एका पॅकेटमध्ये एकुण ११ पाऊच प्रत्येक पाऊचची किंमत १८/- रुपये., ४) १७,६००/- रुपये किंमतीचा V-1 सुगंधी तंबाखुच्या आकाशी रंगाच्या एकुण ०४ मोठ्या गोणी, प्रत्येक गोणीमध्ये एकुण १० लहान गोणी, एका गोणीमध्ये २० पॅकेट व प्रत्येक पॅकेटमध्ये एकुण ११ पाऊच एका पाऊचची किंमत २/- रुपये, ५) १५,००,०००/- रुपये किंमतीचा टाटा कंपनीचा आयसर टेंम्पो क्रमांक MH48AY8498 जु.वा.किं.सु. असा एकुण ३५,२२,२४०/-रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असुन आरोपीत याचे विरुध्द मनोर पोलीस ठाणे गु.र.नं. I १०८/२०२० भा.द.वि.स कलम ३२८,२७२, २७३, १८८ सह अन्न सुरक्षा व मानदे कायदा २००६ नियम व नियमने २०११ चे कलम २६ (२), २७,२३,२६ (२) (iV) सह वाचन कलम ३० (२) (इ) सह वाचन Regulation no. 2.3.4 Of food safty and standard (Prohibitoin and restrcutions on sales), Regulation 2011 सह वाचन Regulation no. 3.1.7 Of food safty and standard ( Food Product standards and Food Additives) Regulation २०११ शिक्षा कलम ५९ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई सहायक पोलीस निरीक्षक श्री.प्रताप दराडे, मनोर पोलीस ठाणे यांचे मार्गदर्शनाखाली मनोर पोलीस ठाणेचे अधिकारी व कर्मचारी यांनी केली आहे.